मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ५११ वा ● बुधवार, ता. ४ फेब्रुवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००





गिळंकृत : या आठवड्याचं मार्मिक मुखपृष्ठ व्यंगचित्रकार- गौरव सर्जेराव

## लाडकी बहीण योजनेला अजित पवार यांचे नाव देण्याची मागणी

**मुंबई । रयत समाचार**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृती जपण्यासाठी राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी लाडकी बहीण योजनेला त्यांचं नाव देण्यात यावं, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसकडून करण्यात येत आहे. राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी ही मागणी पुढे आणली असून, यावर राज्याच्या ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. लातूर जिल्ह्यातील किनगाव येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रचार सभेनंतर माध्यमांशी बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, ''लाडकी बहीण योजनेला अजित पवार यांचं नाव देण्याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री घेतील. जो निर्णय होईल, त्याला आमचं समर्थन राहील.''



आमदार अमोल मिटकरी यांनी सांगितले की, लाडकी बहीण ही योजना अजित पवार यांच्या संकल्पनेतून सुरू झाली असून, 'अजितदादांची लाडकी बहीण' असं नाव दिल्यास त्यांच्या कार्याची आठवण कायम राहील. ही मागणी केवळ राजकीय नसून आदरांजली स्वरूपाची असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मागणी मांडणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. दरम्यान, कोणत्याही शासकीय योजनेचं नाव बदलण्याचा अधिकार मंत्रिमंडळालाच असल्याचं भाजपच्या नेत्यांकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. यावर अंतिम निर्णय मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ स्तरावर घेतला जाईल, असं सांगण्यात आलं आहे. याच पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी अजित पवार यांच्या विमान अपघातावर उपस्थित केलेल्या प्रश्नांवर प्रतिक्रिया देताना पंकजा मुंडे म्हणाल्या, अशा संवेदनशील विषयांवर राजकारण होऊ नये. कोणतीही दिशाभूल होणार नाही याची सर्वांनी काळजी घेतली पाहिजे.

# प्रफुल पटेल यांची मोदी, शाह भेट

## बंद दाराआड चर्चेमुळे राजकीय वर्तुळात खळबळ




**नवी दिल्ली । रयत समाचार**

राज्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलिनीकरणाची चर्चा सुरू असतानाच राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते प्रफुल पटेल यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची स्वतंत्र भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. या भेटीत नेमकी काय चर्चा झाली, याचा तपशील मात्र अधिकृतपणे समोर आलेला नाही. संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या दिल्लीत सुरू आहे. त्यानिमित्त पंतप्रधान मोदी यांनी एनडीएच्या खासदारांची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली. यानंतर प्रफुल पटेल यांनी प्रथम पंतप्रधान मोदी आणि त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची स्वतंत्रपणे भेट घेतली.

या दोन्ही भेटी सुमारे पाच ते सहा मिनिटांच्या झाल्याची माहिती आहे. अजित पवार हयात असताना राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाबाबत चर्चा सुरू होती आणि त्याला केंद्रातील नेतृत्वाकडून ग्रीन सिग्नल मिळाल्याची चर्चा त्यावेळी रंगली होती. त्यामुळे पटेलांची ही भेट अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. दरम्यान, अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर राष्ट्रवादीतील सत्तासमीकरणांबाबत चर्चांना वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर प्रफुल पटेल यांच्याकडे राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची सूत्रे जाणार असल्याच्याही चर्चा होत्या. मात्र, याबाबत स्वतः प्रफुल पटेल यांनी स्पष्टीकरण देत, ''राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाबाबत कोणतीही चर्चा झालेली नाही.

तसेच राष्ट्रीय अध्यक्षपदाचा निर्णय माझ्याशिवाय होईल,'' असं स्पष्ट केलं आहे. त्यामुळे पुढील काळात सुनेत्रा पवार यांची भूमिका महत्त्वाची ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तिसऱ्याच दिवशी सुनेत्रा पवार यांनी शपथ घेतल्यावर झालेल्या टीकेला उत्तर देताना पटेल म्हणाले की, ''कोण किती दिवस दुःख मानावं हा वैयक्तिक प्रश्न आहे,'' असे सांगत त्यांनी टीकाकारांना प्रत्युत्तर दिलं. प्रफुल पटेलांची मोदी-शाह भेट आणि त्यानंतरचं स्पष्टीकरण यामुळे राष्ट्रवादीच्या राजकारणात पुढील काही दिवसांत मोठ्या घडामोडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.




### राज्यात पहिल्यांदाच डॉक्टरवर गुन्हा दाखल

## खऱ्या गरजूंच्या हक्कांची पायमल्ली- विजय कुंभार

**सांगली । रयत समाचार**

दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांवर घाला घालणाऱ्या प्रकाराला आळा घालणारा ऐतिहासिक टप्पा ठरत, राज्यात पहिल्यांदाच एका डॉक्टरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिव्यांगांच्या सवलतींचा गैरवापर करणाऱ्या इस्लामपूर (जि. सांगली) येथील निवृत्त वैद्यकीय अधीक्षक डॉ. रघुनाथ राजाराम भोई यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली असून, या निर्णयाचे स्वागत करत सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

तपासात उघड झाल्यानुसार, डॉ. भोई यांनी स्वतः डॉक्टर असतानाही दिव्यांग व्यक्तींचा अधिकार अधिनियम २०१६ (कलम ९१) व शासन निर्णयानुसार आवश्यक असलेले UDID प्रमाणपत्र नूतनीकरण केले नाही. तसेच UDID प्रणालीत नोंदणी न करता विविध शासकीय योजनांचा लाभ घेतल्याचे निष्पन्न झाले आहे. विशेष म्हणजे वैद्यकीय तपासणीत त्यांचे अपंगत्व फक्त १५ टक्के असल्याचे स्पष्ट झाले असताना, सवलतींसाठी आवश्यक असलेली किमान ४० टक्के अपंगत्वाची अट असूनही त्यांनी लाभ घेतल्याचा आरोप आहे. यावर प्रतिक्रिया देताना विजय कुंभार म्हणाले, हा प्रकार म्हणजे सरळसरळ फसवणूक, नैतिक अधःपतन आणि खऱ्या दिव्यांगांच्या हक्कांवर घाला आहे. बनावट किंवा अपात्र प्रमाणपत्रांच्या जोरावर पदे, सवलती आणि लाभ मिळवले जात असल्याने खऱ्या गरजू दिव्यांगांचे हक्क पायदळी तुडवले जात आहेत. पुढे ते म्हणाले, केवळ गुन्हा दाखल करून थांबणे पुरेसे नाही. अशा प्रकरणांतून मिळवलेले सर्व लाभ परत वसूल करणे आणि उदाहरणार्थ कठोर शिक्षा देणे हीच आजची सामाजिक व कायदेशीर गरज आहे. हा निर्णय भविष्यातील गैरप्रकारांना आळा घालणारा ठरेल. या कारवाईमुळे दिव्यांग हक्कांच्या संरक्षणाबाबत प्रशासनाची भूमिका ठाम झाल्याचे संकेत मिळत असून, राज्यभरातील तत्सम प्रकरणांवरही आता लक्ष केंद्रीत होण्याची शक्यता आहे.

# लोकसभेतील ८ खासदार निलंबित; महाराष्ट्रातील एकाचा समावेश

**नवी दिल्ली । रयत समाचार**

**निलंबित खासदार : माणिकम टागोर, किरण कुमार रेड्डी, प्रशांत पडोले (महाराष्ट्र), हिबी एडन, डीन कुरियाकोसे, एस. वेंकटेशन, गुरजीत सिंग औजला, अमरेंद्र सिंग राजा वारिंग**



लोकसभेत काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाच्या चर्चेदरम्यान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भाषणानंतर सभागृहात गोंधळ निर्माण झाला

यावेळी अध्यक्षांच्या दिशेने कागद भिरकावल्याप्रकरणी महाराष्ट्रातील एका खासदारासह एकूण ८ विरोधी खासदारांना चालू अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी निलंबित करण्यात आले आहे. चर्चेदरम्यान राहुल गांधी यांनी राष्ट्रीय सुरक्षेचा आणि चीन-पाकिस्तान सीमेवरील परिस्थितीचा मुद्दा उपस्थित केला. माजी लष्करी प्रमुख एम. एम. नरवणे यांच्या आत्मचरित्राचा संदर्भ देत त्यांनी सरकारवर निशाणा साधला. ''मी विरोधी पक्षनेता आहे, मला बोलू दिले पाहिजे,'' असे म्हणत त्यांनी पूर्व लडाखमधील संघर्षाचा उल्लेख केला. यावर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी तीव्र आक्षेप घेतला. राहुल गांधी सभागृहाची दिशाभूल करत असून विषय सोडून बोलत असल्याचा आरोप त्यांनी केला. यावरून दोन्ही बाजूंच्या खासदारांमध्ये शाब्दिक चकमक उडाली. सभागृहाचे कामकाज सुरू असताना एका खासदाराने पीठासीन अधिकारी कृष्णा प्रसाद टेनेटी यांना मित्र संबोधले. यावर अध्यक्षांनी कडक शब्दात फटकारत, ''ही संसद आहे, याचे भान ठेवा,'' अशा शब्दात सुनावले. यामुळे विरोधक अधिकच आक्रमक झाले आणि त्यांनी थेट अध्यक्षांच्या समोर (वेलमध्ये) धाव घेत घोषणाबाजी सुरू केली.

गोंधळ इतका वाढला की, काही खासदारांनी अध्यक्षांच्या आसनाकडे कागदाचे तुकडे भिरकावले. या असंसदीय वर्तणुकीची गंभीर दखल घेत ८ खासदारांना निलंबित करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातील प्रशांत पडोले यांचाही समावेश आहे.

राहुल गांधींना बोलू न दिल्याच्या निषेधार्थ इतर विरोधी पक्षीय खासदारांनीही बोलण्यास नकार दिला. समाजवादी पक्षाचे नरेश उत्तम पटेल आणि तृणमूल काँग्रेसच्या खासदारांना बोलण्यासाठी बोलावले असता त्यांनी बहिष्कार टाकला. अखेर वाढता गदारोळ पाहता पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहाचे कामकाज दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब केले.

# एप्स्टीन फाईल : ज्युली के ब्राउन आणि मियामी हेरॉल्डची प्रेरणादायी पत्रकारिता

## सत्याचा परखड पाठपुरावा

काही सिनिअर पत्रकार बऱ्याचदा निराशेने म्हणतात, आम्ही कितीही लिहले तरी व्यवस्था बदलत नाही. कितीही बातम्या छापा बदल होत नाही. प्रशासन आणि समाजावर काही फरक पडत नाही. पण आपण मियामी हेरॉल्ड या वृत्तपत्राच्या धाडसी पत्रकार ज्युली के ब्राउन यांचे कार्य पाहिले तर लक्षात येते की, लिहिण्यात फार मोठी शक्ती असते, ती जग नक्की बदलवते. आज जगभर एप्स्टीन फाईल या एकाच नावाने खळबळ उडाली आहे. जगातील भांडवलशाहीचा मानवताविरोधी विकृत चेहरा समोर आला आहे. हेच काम मियामी हेरॉल्ड या वृत्तपत्राच्या धाडसी पत्रकार ज्युली के ब्राउन यांनी केले आहे. आधी हे प्रकरण छोटी शिक्षा देवून दडपून टाकण्यात आले होते. पण पत्रकार ज्युली आणि मियामी हेरॉल्ड यांचा चिवटपणे केलेला पाठपुरावा कामी आला. ट्रम्प सरकारला निवडणूकीत एप्स्टीन फाईल जनतेसाठी खुल्या करण्याचे आश्वासन द्यावे लागले. लोकांच्या दडपणाने शेवटी या फाईल्स ओपन कराव्या लागल्या. लाखो कागदपत्रे, फोटो, व्हिडीओ आणि इमेल्स खुले केले गेले. विकृत लोकांची मानवताविरोधी विकृत बाजू जगासमोर आली. लैंगिक अत्याचारग्रस्त अल्पवयीन मुलींना न्याय मिळाला, मिळणार आहे.

पत्रकारिता म्हणजे केवळ घडलेल्या घटना मांडणे नव्हे, तर दडपले गेलेले सत्य शोधून समाजासमोर मांडणे. वेगवान बातम्यांचे मथळे, ट्रेंडिंग विषय आणि सोशल मीडियाचा सततचा दबाव यामुळे ही जबाबदारी अधिक कठीण बनली आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेतील शोध पत्रकार ज्युली के. ब्राउन (Julie K. Brown) यांची कारकीर्द नवोदित पत्रकारांसाठी विशेष प्रेरणादायी आहे. ती समजून घेतली पाहिजे.


ज्युली के. ब्राउन यांनी आपल्या पत्रकारितेची सुरुवात गुन्हेगारी प्रकरणे, न्यायालयीन प्रक्रिया आणि न्यायव्यवस्थेतील त्रुटी यांचा सखोल अभ्यास करत केली. त्यांनी कधीही केवळ अधिकृत निवेदनांवर किंवा सरकारी माहितीपत्रकांवर अवलंबून राहणे पसंत केले नाही. न्यायालयीन नोंदी, सरकारी कागदपत्रे, दुर्लक्षित फाईली आणि सर्वसामान्य नागरिकांचे अनुभव यांतूनच त्यांच्या बातम्या आकार घेत गेल्या. त्यांच्या लेखनाची खरी ताकद फक्त आक्रमक भाषेत नसून, तपशीलवार तथ्यांच्या बळावर उभ्या राहणाऱ्या शांत आत्मविश्वासात आहे. मियामी हेरॉल्ड (Miami Herald) या प्रतिष्ठित वृत्तपत्रात काम करत असताना त्यांना तपास पत्रकारितेसाठी आवश्यक असलेले संपादकीय स्वातंत्र्य, वेळ आणि वृत्तपत्र कार्यालयाचे संस्थात्मक पाठबळ मिळाले.



भैरवनाथ वाकळे
संपादक, रयत समाचार
९४०५४०१८००
**मानवाधिकार**

याच काळात त्यांनी हाती घेतलेला जेफ्री एप्स्टीन (Jeffrey Epstein) प्रकरणाचा तपास त्यांच्या पत्रकारितेतील निर्णायक वळण ठरला. हाच आज एप्स्टीन फाईल नावाने जगात धुमाकुळ घालत आहे. भांडवलशाहीची विकृत बाजू जगासमोर आणत आहे. अनेक वर्षे दडपून ठेवलेला, प्रभावशाली व्यक्तींशी संबंधित हा विषय पुन्हा उघड करणे सोपे नव्हते. कायदेशीर गुंतागुंत, राजकीय दबाव, तसेच वैयक्तिक टीका आणि धमक्यांनाही सामोरे जात त्यांनी हा तपास सातत्याने पुढे नेला.

या तपासात त्यांनी सर्वांत महत्त्वाचा निर्णय घेतला तो पीडित महिलांचे अनुभव आणि आवाज केंद्रस्थानी ठेवण्याचा. सनसनाटी मथळ्यांपेक्षा मानवी वेदना, अन्याय आणि न्यायाची गरज त्यांनी ठळकपणे





मांडली. वर्षानुवर्षे चाललेल्या या तपासात त्यांनी हजारो पानांची कागदपत्रे अभ्यासली, गोपनीय करारांचे बारकावे समजून घेतले आणि एकेक दुवा (Link) जोडत संपूर्ण सत्यचित्र समाजासमोर आणले. हीच पद्धत शोध पत्रकारितेची खरी ओळख ठरते.

या कामाचे सुसंगत आणि विस्तृत दस्ताऐवजीकरण म्हणजे त्यांनी लिहिलेले पुस्तक Perversion of Justice या पुस्तकात एप्स्टीन प्रकरण केवळ कथनात्मक स्वरूपात न मांडता, अधिकृत दस्तऐवज, कायदेशीर प्रक्रिया आणि सत्तेच्या गैरवापराचे विश्लेषणाने करण्यात आले आहे. न्यायव्यवस्थेतील अपयश, श्रीमंत आणि सत्ताधारी लोकांना मिळणारे संरक्षण, तसेच पीडितांवर झालेला अन्याय, या सगळ्यांचे स्पष्ट चित्र या पुस्तकातून समोर आले. हे पुस्तक ॲमेझॉन (Amazon) वर उपलब्ध असून, नवोदित पत्रकारांनी ते संदर्भग्रंथ म्हणून वाचणे अत्यंत उपयुक्त ठरते.

या उल्लेखनीय शोध पत्रकारितेसाठी २०१९ मध्ये ज्युली के. ब्राउन यांना Pulitzer Prize for Investigative Reporting ही प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मात्र त्यांनी हा सन्मान स्वतःकडे न ठेवता, सत्य सांगण्याचे धैर्य दाखवणाऱ्या पीडितांचा असल्याचे नम्रपणे सांगितले. हीच भूमिका त्यांच्या पत्रकारितेची नैतिक बैठक अधोरेखित करते, पत्रकार हा नायक नसून, सत्यापर्यंत पोहोचण्याचे माध्यम असतो.

आज पत्रकारिता शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या वाटचालीतून अनेक महत्त्वाचे धडे मिळतात. तपास पत्रकारिता ही झटपट यशाची शर्यत नसून दीर्घकाळ चालणारी साधना आहे. प्रत्येक बातमीमागे वेळ, अभ्यास, संयम आणि नैतिकता आवश्यक असते. अचूकता, संवेदनशीलता आणि मानवी मूल्ये याशिवाय पत्रकारितेला अर्थ राहत नाही.




आज भारतातही पत्रकारितेचे विद्यार्थी दबाव, वेग, स्पर्धा आणि विश्वासार्हतेच्या संकटाला सामोरे जात आहेत. अशा वेळी ज्युली के. ब्राउन यांची पत्रकारिता आणि Perversion of Justice हे पुस्तक महत्वाचा संदेश देते तो म्हणजे शांत, संयमी आणि तथ्याधारित लेखनही समाजबदल घडवू शकते.

रयत समाचारच्या माध्यमातून मियामी हेरॉल्ड आणि ज्युली के. ब्राउन यांच्या प्रेरणेतून नव्या पिढीच्या पत्रकारांना हीच शिकवण द्यायची आहे की, पत्रकारिता हा केवळ पोटापाण्याचा धंदा नसून मानवाधिकार आणि लोकशाहीची महत्वाची जबाबदारी आहे. ही जबाबदारी प्रामाणिकपणे पेलली, तर शब्दही इतिहास घडवू शकतात.

## अहिल्याबाई होळकर ३०० रुपयांच्या स्मृतिनाण्याचे सादरीकरण;

# स्मृतिनाणे इतिहासाची आठवण करून देणारे- आसिफ खान

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्याबाई होळकर या केवळ एक शासक नव्हत्या, तर त्या न्याय, सेवा आणि धर्मनिष्ठेचे प्रतीक होत्या. त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारत सरकारने काढलेले ३०० रुपयांचे चांदीचे स्मृतिनाणे हे आपल्या गौरवशाली इतिहासाची आठवण करून देणारे आहे.

अशा उपक्रमांमुळे इतिहासाचे संवर्धन होऊन तरुण पिढीला प्रेरणा मिळते. अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळ सदैव अशा ऐतिहासिक उपक्रमांना प्रोत्साहन देत राहील, असे प्रतिपादन अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळाचे अध्यक्ष आसिफ दुलेखान यांनी केले. याप्रसंगी अहमदनगर इतिहास

**अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारत सरकारतर्फे तीनशे रुपयांचे चांदीचे स्मृतिनाणे जारी करण्यात आले. या ऐतिहासिक नाण्याचे नगर येथील नामवंत जुनी नाणी व नोटा संग्राहक सचिन डागा यांनी अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळाला भेट देत सादरीकरण केले.**

प्रेमी मंडळाचे अध्यक्ष आसिफ दुलेखान, इंजि. अभिजीत एकनाथ वाघ, आरिफ सय्यद, राजा भैया, पत्रकार आबीद खान यांच्यासह इतिहासप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मनोगत व्यक्त





करताना सचिन डागा म्हणाले की, अहिल्याबाई होळकर यांचे सामाजिक, धार्मिक व प्रशासकीय कार्य आजही प्रेरणादायी असून त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी भारत सरकारने काढलेले हे स्मृतिनाणे ऐतिहासिक ठरत आहे. अशा उपक्रमांमुळे नव्या पिढीमध्ये इतिहासाविषयी जागरूकता निर्माण होईल, असेही त्यांनी नमूद केले.



## संत रविदास महाराज जयंती उत्साहात साजरी

# नवनिर्वाचित नगरसेवकांकडून अभिवादन

**अहमदनगर । रयत समाचार**

शहरातील परशुराम खुंट येथील भोलेनाथ मंदिर परिसरात संत शिरोमणी रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती श्रद्धापूर्वक व उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संत रविदास महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी संतांच्या कार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांचे समाजात आचरण होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यक्रमास नगरसेवक दत्ता कावरे, बाळासाहेब बोराटे, संभाजी कदम, परेश लोखंडे, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजीराव साळवे यांच्यासह अभिनव सूर्यवंशी, तेजस गुंदेचा, किरण वाघमारे, सचिन वाघमारे, महेश आहेर, धनंजय कबाडे, उमेश दहीहंडे, अजय हरबा, संतोष कबाडे, संजू हंकारे, अक्षय, प्रितेश सूर्यवंशी, करण सूर्यवंशी, शुभम गुजर, सत्यम गुजर, संतोष सूर्यवंशी, संतोष गुजर आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने

**संत शिरोमणी रविदास महाराज यांनी समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश दिला. जाती-धर्माच्या भिंती तोडून समाज एकसंघ ठेवण्याचे कार्य त्यांनी आपल्या विचारातून केले. आजच्या काळात त्यांचे विचार अधिक महत्त्वाचे असून तरुण पिढीने त्यांचा आदर्श घ्यावा.**

**दत्ता कावरे,** नगरसेवक

उपस्थित होते. बाळासाहेब बोराटे म्हणाले की, ''संत रविदास महाराजांनी कर्माला महत्त्व देत समाजातील दुर्बल घटकांना आत्मसन्मानाने जगण्याची शिकवण दिली. त्यांच्या विचारांमुळे समाजात परिवर्तन घडून आले असून ते आजही मार्गदर्शक ठरतात.'' संभाजी कदम यांनीही समाजात शांतता, समता व सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यासाठी संत रविदास महाराजांचे विचार अंगीकारण्याचे आवाहन केले.

# संशोधनातून औद्योगिक प्रगती साध्य होईल- कुलकर्णी

## डॉ. विखे अभियांत्रिकीत आंतरराष्ट्रीय परिषदांचे उद्घाटन



**अहमदनगर । विजय मते**

अहिल्यानगर येथील विळद घाट परिसरातील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या यंत्र अभियांत्रिकी विभागात मटेरियल सायन्स तसेच एनर्जी अँड एन्व्हायरमेंटल इंजिनिअरिंग या विषयांवरील दोन आंतरराष्ट्रीय परिषदांचा संयुक्त उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला. या दोन्ही परिषदांचे आयोजन ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले होते. यंत्र अभियांत्रिकी विभाग, टेक्नॉलॉजी रिसर्च अँड इनोव्हेशन सेंटर,

**परिषदेसाठी २१ देशांतील नामांकित विद्यापीठे व संशोधन संस्थांकडून २१२ शोधनिबंध प्राप्त झाले असून त्यापैकी ६९ शोधनिबंधांचे ११ सत्रांत सादरीकरण करण्यात आले. भारतातील आयआयटी व एनआयटी संस्थांचाही यात समावेश होता.**

अकॅडमी ऑफ नॅनोटेक्नॉलॉजी अँड वेस्ट वॉटर इनोव्हेशन (जोहान्सबर्ग) आणि कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोवेनंट युनिव्हर्सिटी (नायजेरिया) यांच्या संयुक्त विद्यमाने मटेरियल सायन्सवरील सलग पाचवी आणि ॲडव्हान्सेस इन एनर्जी अँड एन्व्हायरमेंटल इंजिनिअरिंगवरील सलग दुसरी आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती.

उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून व्ही.आर.डी.ई. अहिल्यानगरचे असोसिएट डायरेक्टर व सायंटिस्ट मंगेश कुलकर्णी उपस्थित होते. संशोधनातूनच शाश्वत विकास, स्वच्छ ऊर्जा, पर्यावरण संरक्षण व औद्योगिक प्रगती साध्य होईल, असे त्यांनी सांगितले. अशा परिषदांमुळे विद्यार्थ्यांना व संशोधकांना जागतिक संशोधनाची दिशा समजते, असेही त्यांनी नमूद केले. की-नोट स्पीकर्स म्हणून डॉ. सर्जी गोरबोचेव्ह (चीन), डॉ. संडे ओयेडेपो (नायजेरिया) आणि प्रा. सुटेरीस कालोगिरू (सायप्रस) यांनी मार्गदर्शन केले. शोधनिबंधांचे मूल्यमापन २२ तज्ज्ञांच्या पॅनलने केले. मटेरियल सायन्सवरील शोधनिबंध स्वित्झर्लंड येथील ट्रान्सटेक पब्लिकेशन जर्नलमध्ये, तर एनर्जी व एन्व्हायरमेंटल इंजिनिअरिंगवरील शोधनिबंध आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रसिद्ध होणार आहेत. या परिषदांच्या यशस्वी आयोजनासाठी विभागप्रमुख डॉ. सुशील मगर व कन्व्हेनर डॉ. कानिफ मरकड यांनी विशेष प्रयत्न केले. संस्थेचे चेअरमन व जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील आणि मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.




कचऱ्याचे ढिग तात्काळ हटवा, पर्यावरणवादी गवते यांची मागणी

# शहरात प्रवेश करताच कचऱ्याने स्वागत, अहिल्यानगरची प्रतिमा मलीन

**अहमदनगर । रयत समाचार**

शहरात प्रवेश करताना चोहीबाजूंनी साचलेल्या कचऱ्याच्या ढिगांमुळे अहिल्यानगर शहराची प्रतिमा मलीन होत असल्याचा आरोप पर्यावरणवादी कार्यकर्ते गोरक्षनाथ गवते यांनी केला. शहराच्या दर्शनी भागातील कचऱ्याचे ढिग तात्काळ हटवावेत, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकारी व महापालिका आयुक्तांकडे केली.

बुऱ्हाणनगर, भिंगार परिसरातून शहरात येणारे रस्ते, एमआयडीसीकडून येणारे मार्ग तसेच महामार्गालगत मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला आहे. त्यामुळे शहरात प्रवेश करतानाच नागरिक व पाहुण्यांना घाणीचे दर्शन घडत



**कचऱ्यामुळे प्राणीजीवन धोक्यात**

**शहरातील कचऱ्यातील प्लास्टिक खाल्ल्याने गायी, कुत्रे यांसारख्या प्राण्यांना गंभीर आजार होत असून दुर्गंधी व प्रदूषणातही वाढ झाली आहे. शहराच्या दर्शनी भागातील कचरा जणू येणाऱ्या-जाणाऱ्यांचे ''स्वागत'' करत असल्याची उपरोधिक टीकाही गवते यांनी केली.**

असून स्वच्छ शहर म्हणून असलेली ओळख धोक्यात आली आहे. एकीकडे स्वच्छतेचे पुरस्कार मिळत असताना प्रवेशद्वारावर कचऱ्याचे ढिग दिसणे दुर्दैवी असल्याचे गवते यांनी नमूद केले. कचरा तात्काळ न उचलल्यास १४ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय व महापालिका कार्यालयासमोर प्रतिकात्मक स्वरूपात कचरा टाकून आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. संघटनेच्या बैठकीत बोलताना गवते यांनी वाढत्या प्रदूषणावर चिंता व्यक्त करत झाडतोड थांबवली नाही, तर भविष्यात सजीवांचे अस्तित्व धोक्यात येईल, असा इशारा दिला. शासनाने गांभीर्याने दखल न घेतल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



# पांडुरंगाच्या सेवेत दर्शनाचा अलौकिक अनुभव-जोशी

## विठ्ठलरुक्मिणी मंदिराचा २९ वा वर्धापन दिन साजरा

**अहमदनगर । विजय मते**

पांडुरंगाच्या सेवेमुळे विठ्ठलरुक्मिणीच्या दर्शनाचा अलौकिक, समाधानकारक व अविस्मरणीय अनुभव मिळतो. सेवा, श्रद्धा व निष्ठा या त्रिसूत्रीवर भक्ती उभी असून निस्वार्थ भावनेने केलेली सेवा हीच खरी उपासना आहे, असे प्रतिपादन विठ्ठलरुक्मिणी मंदिराचे आदिनाथ जोशी यांनी केले. छत्रपती संभाजीनगर रोडवरील अर्बन बँक कॉलनीतील हौशी विठोबा मंदिरात भाविकांना नियमित दर्शनाचा लाभ मिळतो. दर एकादशीला भाविकांची मोठी गर्दी होत असून आषाढी वारीत दिंड्यांमधील वारकरी येथे सेवा करतात. या मंदिराचा २९ वा वर्धापन दिन भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. पहाटे श्री विठ्ठलरुक्मिणी मूर्तीला विधिवत रुद्राभिषेक करण्यात आला.

सायंकाळी मंदिर परिसरात फुलांची सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली. महाआरतीस भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाचवीत शिकणाऱ्या स्वानंदी तुषार देशमुख हिने विठ्ठलरुक्मिणीवरील अभंग व भक्तिगीते सादर करून उपस्थितांना भक्तिरसात चिंब केले. या प्रसंगी श्री व सौ. प्रज्ञा अभिजीत जोशी, भार्गव जोशी, संगीता खरमाळे यांच्यासह नागरिक व भाविक उपस्थित होते.

वर्धापन दिनानिमित्त भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. निखिल वारे, वर्षा सानप यांच्यासह मान्यवरांनी दर्शन घेत धार्मिक उपक्रम समाजात सकारात्मकता वाढवतात, असे मत व्यक्त केले. विठ्ठलरुक्मिणीच्या जयघोषात मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्यांचे आभार अभिजीत जोशी यांनी मानले.

## कासम शहावली बाबांचा संदल उरूस, कव्वालीचे आयोजन

**अहमदनगर । रयत समाचार**

हिंदूमुस्लिम ऐक्याचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या हातमपुरा चौक येथील हाजी सय्यद सुलतानुद्दीन शहावली उर्फ कासम शहावली बाबा यांच्या दर्ग्याचा वार्षिक संदल व उरूस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. या उरूसनिमित्त भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मुजावर कैसरभाई सय्यद यांनी केले आहे. कासम शहावली बाबा दर्गा हे सर्वधर्मीय भाविकांचे श्रद्धास्थान असून येथे दरवर्षी मोठ्या उत्साहात उरूस साजरा केला जातो. यावर्षी उरूस कार्यक्रमाची सुरुवात गुरुवार, ता. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी कुराणखाणीने होणार आहे. शुक्रवार, ता. ६ फ ेब्रुवारी रोजी संदल शरीफ, तर शनिवार, ता. ७ फेब्रुवारी रोजी मुख्य उरूस सोहळा पार पडणार आहे. उरूसनिमित्त शनिवार, ता. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत लंगर (भंडारा) आयोजित करण्यात आला आहे. तसेच रात्री ८ वाजता भाविकांसाठी शानदार कव्वालीचा कार्यक्रम होणार असून नागरिकांनी व भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या उरूस कार्यक्रमाचे आयोजन मुजावर कैसर सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून उरूस कमिटीचे सदस्य कैसर सय्यद, बाळासाहेब घोरपडे, नारायण हरबा, सलीम शेख, संजू जगताप, विशाल भिंगारदिवे, योगेश काशीद, उद्धव बारस्कर, दत्तू वाघ, पप्पू भिंगारदिवे, पोपट जाधव, सुजय म्हस्के आदींनी भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

रयत समाचार Classified

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art

सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट

7020356335 | 9860830016

पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!

कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द

जगदंबा टी सेंटर

चहा, कॉफी, लेमन टी

शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर

शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर

प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे

97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० । ७७७४००१८०० । ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# लाल बावटा युनियनच्या कायदेशीर लढ्याला यश

## न्यायालयाकडून मोहटादेवी ट्रस्टचा 'शिफ्ट बदल' आदेश रद्द

**पाथर्डी । रयत समाचार**

पाथर्डी येथील श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट (मोहटा देवी) प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या कामाच्या पाळीत केलेला बदल 'प्रथमदर्शनी बेकायदेशीर व अनुचित कामगार प्रथा' ठरत असल्याचे नमूद करत औद्योगिक न्यायालयाने त्या आदेशाला स्थगिती दिली आहे. लाल बावटा जनरल कामगार युनियनने ३४ कर्मचाऱ्यांच्या वतीने दाखल केलेल्या तक्रारीतील अंतरिम अर्जावर २८ जानेवारी २०२६ रोजी हा महत्त्वपूर्ण निकाल देण्यात आला.





संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ७ ऑक्टोबर २०२५ रोजी परिपत्रक काढून कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळेत अचानक बदल केला होता. कोणतीही कायदेशीर नोटीस न देता व कामगारांना विश्वासात न घेता हा बदल केल्याने औद्योगिक विवाद कायदा १९४७ मधील कलम ९-अ चे उल्लंघन झाल्याचा मुद्दा न्यायालयात सिद्ध झाला. कर्मचाऱ्यांच्या वतीने ॲड. दीपक चंगेडे यांनी युक्तिवाद करत मंदिर परिसर अतिदुर्गम व वन्यप्राण्यांच्या धोक्याचा असल्याने मध्यरात्री कामावर येणे-जाणे जीवितास धोका असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणले. न्यायालयाने 'बॅलन्स ऑफ कन्व्हिनियन्स' तपासत कामगारांच्या बाजूने निर्णय दिला.

**न्यायालयाचे मुख्य आदेशात्मक निर्देश**

**७ ऑक्टोबर २०२५ च्या शिफ्ट बदल आदेशास अंतिम निकालापर्यंत अंतरिम स्थगिती. कर्मचाऱ्यांची कामाची वेळ पूर्वीप्रमाणेच कायम ठेवण्याचे निर्देश. ट्रस्टने तात्काळ जुन्या वेळेनुसार काम सुरू ठेवण्याचे आदेश.**

या विजयाबद्दल आयटकचे राज्य सचिव शाम काळे, भाकपचे राज्य सचिव ॲड. सुभाष लांडे, राष्ट्रीय सचिव डॉ. भालचंद्र कांगो, सूर्यकुमार दामले व युनियनचे उपाध्यक्ष कॉ. सतीश पवार यांनी समाधान व्यक्त केले. याचिका जनरल सेक्रेटरी ॲड. सुधीर टोकेकर, शहादेव पालवे, मारुती दहिफळे, वसंत दहिफळे, अमोल गायकवाड, राजेंद्र दहिफळे व इतर कर्मचाऱ्यांतर्फे दाखल करण्यात आली होती. संघटनेचे जनरल सेक्रेटरी ॲड. सुधीर टोकेकर यांनी यापूर्वीही अशाच प्रकरणात न्याय मिळवून दिल्याचे नमूद करत त्यांच्या कार्याबद्दल कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. या निकालामुळे कामगारांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



# जिद्द, चिकाटी व मेहनत असेल तर यश नक्कीच मिळते- जाधव

## श्री अभ्यासिकेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**शेवगाव । रयत समाचार**

शेवगाव शहरातील निवृत्ती झाडे संचलित श्री अभ्यासिकेतील अमोल बडधे व अविष्कार खरड यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. अमोल बडधे यांची छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कक्षसेवक पदावर, तर अविष्कार खरड यांची केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) मध्ये निवड झाल्याबद्दल हा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास शेवगाव नगर परिषदेचे नगरसेवक संतोष जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निवृत्ती झाडे म्हणाले की, अमोल बडधे व अविष्कार खरड हे दोघेही प्रामाणिकपणे सकाळपासून संध्याकाळपर्यंत अभ्यास करत असत. त्यांच्या मेहनतीचे फळ त्यांना मिळाले असून श्री अभ्यासिकेतील अनेक विद्यार्थी अशाच प्रकारे शासकीय सेवेत यशस्वी झाले आहेत. नगरसेवक संतोष जाधव यांनी विद्यार्थ्यांमध्ये जिद्द, चिकाटी व मेहनत असेल तर यश नक्कीच मिळते, असे मत व्यक्त केले. यावेळी पत्रकार ऋषिकेश काळे व नगरसेवक संतोष जाधव यांच्या हस्ते अमोल बडधे व अविष्कार खरड यांचा सत्कार करण्यात आला. अमोल बडधे यांनी मनोगतात कुठलीही गोष्ट अशक्य नसून प्रामाणिक कष्ट, जिद्द व चिकाटीने यश मिळू शकते, असे सांगितले. कार्यक्रमानंतर निवृत्ती झाडे यांच्या वतीने अभ्यासिकेतील सर्व विद्यार्थ्यांना मिठाई व जिलेबी वाटप करण्यात आले.

# नागरिकांच्या सतर्कतेने अवैध मुरूम उत्खनन रोखले

## महानगरपालिका तलाव परिसरात महसूलची कारवाई



**नगर तालुका । रयत समाचार**

पिंपळगाव माळवी येथील महानगरपालिकेच्या तलाव परिसरात मागील काही दिवसांपासून अवैध मुरूम उपसा सुरू होता. त्यामुळे तलावाला धोका निर्माण होऊन पर्यावरणीय संतुलन बिघडत होते. याबाबत परिसरातील शेतकऱ्यांनी आवाज उठविल्यानंतर महसूल विभागाने दखल घेतली. काल रात्री महसूल विभागाच्या पथकाने अवैध मुरूम उत्खनन करताना एक डंपर पकडून तहसील कार्यालयात जमा केला.

निवासी नायब तहसीलदार गौरव दळवी यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाने ही कारवाई केली. घटनास्थळी धाड टाकून अवैध उत्खनन करणारा डंपर जप्त करण्यात आला असून तो तहसील कार्यालयात जमा करण्यात आला आहे.

या कारवाईमुळे अवैध उत्खनन करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पथकात संभाजी ठोंबरे, शशिकांत मोरे, कुणाल काळे, संतोष काळे व सुनील कातोरे सहभागी होते. या कारवाईबद्दल परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच महानगरपालिकेने तलावाच्या भिंतीवरील झाडे काढून भिंतीचे संरक्षण करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

> तलावाच्या संरक्षणासाठी व अवैध उत्खनन रोखण्यासाठी अशा कारवाया नियमितपणे केल्या जाणार आहेत. यामुळे पर्यावरण संरक्षणास मदत होईल.
>
> गौरव दळवी,
> निवासी नायब तहसीलदार

# श्रीगोंदा विद्यालयात 'रंगतरंग' कार्यक्रम उत्साहात



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

गरीब व वंचित कुटुंबातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी या उद्देशाने १९९५ साली सामाजिक कार्यकर्ते घनशाम शेलार यांनी स्थापन केलेल्या श्रीगोंदा माध्यमिक विद्यालयात सध्या ३०० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा व त्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी विद्यालयात विविध उपक्रम राबविले जातात. याच उपक्रमांचा एक भाग म्हणून विद्यालयात 'रंगतरंग' या विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन सोमवार, ता. २ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन मनीषा शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. हा कार्यक्रम अत्यंत उत्साही व आनंदी वातावरणात झाला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी लावणीसह विविध नृत्यप्रकार सादर करत उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला पालक व प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमाच्या तयारीसाठी शितल इथापे व सविता निकाळजे यांनी विशेष परिश्रम घेतले. पावसे डेकोरेटर्स यांनी आकर्षक सजावट व उत्कृष्ट साऊंड सिस्टिमची व्यवस्था केल्याने कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढली. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष घनशाम शेलार, संस्थेचे विश्वस्त बाळासाहेब शेलार, मुख्याध्यापक सुभाष जामदार, उद्योजक मोहन भिंताडे, प्रकाश निंभोरे, अजीम जकाते, पत्रकार माधव बनसुडे यांच्यासह पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भुजबळ यांनी केले. 'रंगतरंग' कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाल्याबद्दल उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# माथणी शाळेतील मंजुश्री घोरपडेला भारत सरकारचा राष्ट्रीय पुरस्कार

## उपराष्ट्रपती, संरक्षण, शिक्षण राज्यमंत्री व तिन्ही सैन्यदल प्रमुखांकडून गौरव

**नगर तालुका । रयत समाचार**

माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील मंजुश्री घोरपडे या विद्यार्थीनीस भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालय व शिक्षण मंत्रालयाच्या वतीने दिला जाणारा 'वीरगाथा' राष्ट्रीय पुरस्कार नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला.

भारताचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी, लष्करप्रमुख जनरल अनिल चौहान, नौदलप्रमुख दिनेशकुमार त्रिपाठी, हवाईदलप्रमुख अमरप्रीत सिंग, संरक्षण सचिव डॉ. समीर कामंत, शिक्षण सचिव संजय कुमार व आर्थिक सल्लागार राजकुमार अरोरा यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी मार्गदर्शक शिक्षक सुनील अडसूळ उपस्थित होते. या उपक्रमासाठी संगमनेर डायटच्या नोडल अधिकारी ज्योती निंबाळकर यांनी वेळोवेळी शिक्षकांना मार्गदर्शन केले.

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये भारत सरकारतर्फे राबविण्यात आलेल्या 'वीरगाथा ५.०' या राष्ट्रीय स्पर्धेत मंजुश्री घोरपडे हिची देशपातळीवरील 'सुपर १००' विजेत्यांमध्ये निवड झाली होती. या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्ली येथे राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आले.**



या स्पर्धेत देशभरातून १,९२,४८,००९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. तसेच या विद्यार्थ्यांची प्रजासत्ताक दिन सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून निवड करण्यात आली होती. मंजुश्रीला शिक्षक सुनील अडसूळ व राहुल व्यवहारे यांनी मार्गदर्शन केले होते. या यशाबद्दल राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, संगमनेर डायटचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर, जिल्हा नोडल अधिकारी ज्योती निंबाळकर, गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते, केंद्रप्रमुख संजय धामणे, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त विक्रम अडसूळ, सरपंच विलासराव घोरपडे, उपसरपंच अशोक कांडेकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर घोरपडे, ग्रामस्थ व पालकांनी विद्यार्थीनी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# विद्युत दिवे, सीसीटीव्ही व गार्डन उभारण्याची मागणी;

## नगरसेवक अमोल गर्जे प्रयत्नशील



**पाथर्डी । नितीन गटाणी**

प्रभाग क्रमांक ५मध्ये आवश्यक ठिकाणी विद्युत दिवे व सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, तसेच पालिकेच्या मालकीच्या लकार गल्ली येथील भूखंडावर गार्डन उभारावे, अशी मागणी नगरसेवक अमोल गर्जे यांनी नगराध्यक्ष अभय आव्हाड व मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

शहराच्या मध्यवस्तीत असलेल्या प्रभाग क्रमांक ५मधील अनेक भागांत विद्युत दिवे बंद असल्याने छोट्या-मोठ्या चोरीच्या घटना तसेच छेडछाडीचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे पालिका प्रशासनाने तात्काळ बंद असलेले विद्युत दिवे दुरुस्त करावेत व आवश्यक ठिकाणी नवीन दिवे बसवावेत. तसेच संपूर्ण प्रभाग व शहरातील मुख्य रस्त्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. यासह लकार गल्लीतील जुने भाजी बाजारतळ येथील नगरपरिषदेच्या मोकळ्या भूखंडावर घाणीचे साम्राज्य पसरले असून मागील काही वर्षांपासून परिसरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

प्रशासनाने याची दखल घेऊन या जागेवर नागरिकांसाठी गार्डन उभारावे. यामुळे घाणीचे साम्राज्य दूर होऊन सर्व नागरिकांना गार्डनचा लाभ घेता येईल. लहान मुलांसाठी खेळणी उपलब्ध करून द्यावीत तसेच आवश्यक आसन व विद्युत व्यवस्था उभारावी. शहराच्या मध्यवर्ती एकही गार्डन नसल्याने अबाल-वृद्ध, महिला व नागरिकांना मोकळा वेळ घालवण्यासाठी हक्काची जागा नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



# वाढदिवस साजरे करताना सामाजिक बांधिलकी जोपासावी- अंबाडे

## अन्विका अंबाडे हिच्या वाढदिवसानिमित्त गणवेश वाटप

**नेवासा । रावसाहेब राशिनकर**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चांदा येथे संस्थेचे माजी अध्यक्ष मोहनराव गंगाराम हापसे यांची जयंती संस्था कार्यकारिणी सदस्य डॉ. दिपक शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्था कार्यकारिणी सदस्य नानासाहेब अंबाडे, माजी जि. प. सदस्या विजया नानासाहेब अंबाडे व अनिता अंबाडे उपस्थित होते. कार्यक्रमप्रसंगी नानासाहेब अंबाडे यांच्या नात अन्विका कमलाकर अंबाडे हिच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जोपासत जवाहर विद्यार्थी वसतिगृह, चांदा येथील २७ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शालेय गणवेशाचे वितरण करण्यात आले. आपल्या मनोगतात नानासाहेब अंबाडे यांनी सर्वांनीच आपले वाढदिवस साजरे करताना अनाथ व गरजूंना मदत करून सामाजिक बांधिलकी जोपासावी, असे आवाहन केले.

यावेळी व्यासपीठावर माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष डॉ. विनोद गुंदेचा, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कैलास दहातोंडे, उपाध्यक्ष किरण जावळे, शालेय समिती सदस्य प्रा. अशोक चौधरी, प्राचार्य अंशुमन वाकचौरे, उपप्राचार्य रघुनाथ भोजने, वसतिगृह अधीक्षक बाळासाहेब फलके तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उच्च माध्यमिक विद्यालय समन्वयक प्रा. भाऊसाहेब तांबे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रावसाहेब राशिनकर यांनी केले, तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख स्वाती दळवी यांनी मानले.

# फेसबुकचा वाढदिवस

विज्ञानामुळे जग जवळ आले आहे असे लहानपणी ऐकले होते; पण याची खरी प्रचिती फेसबूक या सोशल नेटवर्किंग साईटमुळेच आली. फेसबुक या सोशल नेटवर्किंग साईटला आज म्हणजे ४ फेब्रुवारी रोजी २२ वर्ष पूर्ण झाली. याचाच अर्थ आज फेसबुकचा बाविसावा वाढदिवस आहे. आज जगभरात फेसबुक वापरणाऱ्यांची संख्या तीनशे कोटीहून अधिक आहे. अमेरिकेत माहिती गोळा करणाऱ्या पुस्तकाला फेसबुक असे म्हटले जाते. अमेरिकेत जेव्हा डिजिटल युगाची सुरुवात झाली तेव्हा ही माहिती डिजिटल स्वरूपात आणण्याचे आव्हान मार्क झुकरबर्ग या तरुण मुलाने स्वीकारले. हार्वर्ड विद्यापीठात शिकत असलेल्या मार्कने डस्टिन मॉस्कोविट्स, अँड्र्यूआर्डो सर्विन आणि ख्रिस ह्युजेस या आपल्या मित्रांच्या सोबतीने फेसबुकची स्थापना केली. ४ फेब्रुवारी २००४ रोजी मार्कने हार्वर्ड विद्यापीठाच्या वसतिगृहात फेसबुक सुरू केले. अल्पावधीतच या सोशल नेटवर्किंग साईटने तरुणांना अक्षरशः वेड लावले. फेसबुक आज जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेटवर्किंग साईट बनली आहे. २२ वर्षापूर्वी मार्कने जे रोपटे लावले त्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले. जगातील जवळपास पंधरा देशात फेसबुकची कार्यालये आहेत. फेसबुकची आज पाच हजार कोटींची उलाढाल आहे. फेसबुकला मिळणाऱ्या जाहिरातींमुळे फेसबुकला विनामूल्य सेवा देणे शक्य झाले. १८ मे २०१२ ला फेसबुकने आपले शेअर विकायला काढले या शेअर्सने बाजारात धुमाकूळ घातला. या शेअर्समुळे फेसबुकला कोट्यवधी रुपयांचा फायदा झाला. फेसबुकने व्हॉट्सअॅप आणि इंस्टाग्राम या नेटवर्किंग साईटसना देखील आपल्या कवेत घेतले. फेसबुकची वाढती लोकप्रियता पाहून गुगलने फेसबुक विकत घेण्याचा प्रस्ताव मार्क झुकरबर्ग समोर ठेवला मात्र त्याने तो फेटाळून लावला. इंटरनेट विश्वात गुगल नंतर सर्वात जास्त विजिट होणारी वेबसाईट फेसबुक हीच आहे. आजच्या युगात फेसबुक हा तरुणांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. फेसबुक निर्मितीचे एकमेकांशी संवाद साधने, मतप्रदर्शन आणि देवाणघेवाण हे मुख्य उद्देश होते व आजही कायम आहेत. यासोबतच नवनवीन फीचर्स फेसबुक वापरकर्त्यांसाठी आणते. फेसबुकने आता वापरकर्त्यांसाठी ए आय ची सुविधा उपलब्ध करून दिली. त्यामुळे वापरकर्ते ए आय च्या मदतीने आपल्याला हवी ती माहिती क्षणार्धात मिळवू शकतात. तसेच ए आय चा वापर करून आपले फोटो, व्हिडिओ, रिल्स शेअर करू शकतात. फेसबुकवर दररोज अब्जावधी फोटो, व्हिडिओ आणि रिल्स शेअर केले जातात. तसेच फेसबुकवर दररोज अब्जावधी पोस्टचा पाऊस पडतो. फेसबुक आज अनेकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले. फेसबुकवर एका वापर कर्त्याचे सरासरी पाचशे मित्र आहेत तो दररोज दहा लोकांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवतो किंवा स्वीकारतो फेसबुकवर आज इतके युजर्स आहेत की त्या सर्वांचे एक कुटुंब करायचे म्हटलं तर त्या कुटुंबाची लोकसंख्या जगातील कोणत्याही देशातील लोकसंख्येपेक्षा अधिक असेल. हे विश्वची माझे घर.... या उक्तीप्रमाणे संपूर्ण विश्वाला एक कुटुंब बनवण्याचे काम फेसबुकने केले.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

आज इंस्टाग्रामवर अधिक वेळ घालवत असली तरी फेसबुक ही त्यांना तितकेच प्रिय आहे. फेसबुकवर सर्वच वयोगटातील लोकांचे अकाऊंट आहे. प्रत्येकाला फेसबुक जवळचा वाटतो.

फेसबुक नंतर अनेक सोशल नेटवर्किंग साईट आल्या पण फेसबुकने आपला दर्जा कायम ठेवला त्यामुळेच २२ वर्ष होऊनही फेसबुकची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. सर्वांच्या लाडक्या फेसबुकला २२ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# गोव्यात पहिल्या राष्ट्रीय पुस्तक महोत्सवाचे आयोजन

**पणजी । प्रभाकर ढगे**

४ ते ८ फेब्रुवारी दरम्यान पणजी येथील दयानंद बांदोडकर मैदानावर पहिल्या राष्ट्रीय स्तरावरील गोवा पुस्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात लेखक, वाचक, प्रकाशक, विचारवंत, संशोधक, विद्यार्थी आणि पालक-मुले एकाच व्यासपीठावर एकत्र येऊन पुस्तके, कल्पना आणि संस्कृतीचा उत्सव साजरा करतील. शिक्षण मंत्रालयाच्या नॅशनल बुक ट्रस्टने गोवा सरकार, समर्थ युवा फाउंडेशन आणि लोकमान्य कल्चरल फाउंडेशन यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या मेळ्यात देशभरातील लेखक, इतिहासकार, विचारवंत, बॉलिवूड सेलिब्रिटी आणि कायदेतज्ज्ञांना सहभागी होण्यासाठी आणि संवादात्मक सत्रांमध्ये त्यांचे विचार मांडण्यासाठी आमंत्रित केले जाईल, तसेच सर्व वयोगटातील प्रेक्षकांसाठी आकर्षक अनुभव सादर केले जातील.

''कथांचा अथांग सागर असलेल्या या गोवा पुस्तक महोत्सवात १०० हून अधिक प्रकाशकांचे २०० हून अधिक पुस्तकांचे स्टॉल्स असतील, ज्यात इंग्रजी, मराठी, हिंदी, कोकणी आणि इतर भारतीय भाषांमधील विविध प्रकारच्या पुस्तकांचे प्रदर्शन केले जाईल,'' असे शिक्षण मंत्रालयाच्या नॅशनल बुक ट्रस्टचे संचालक आणि पुस्तक मेळ्याचे सीईओ युवराज मलिक यांनी पणजी येथे माध्यमांशी बोलताना सांगितले. देशात पुस्तक वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी आयोजित केलेल्या अनेक उपक्रमांपैकी हा एक कार्यक्रम असल्याचे जाहीर करताना मलिक यांनी आशा व्यक्त केली की, गोव्याला आपला पहिला भव्य पुस्तक महोत्सव मिळेल, जो राज्याच्या विविध कार्यक्रमांच्या दिनदर्शिकेत एक अतिरिक्त आकर्षण ठरेल.

Ocean of Stories
GOA BOOK FESTIVAL
PANAJI | 2026

गोवा: स्टोरीज ऑफ लाईट अँड डिलाईट नावाचे एक विशेष प्रदर्शन आयोजित केले जाईल, ज्यात नॅशनल बुक ट्रस्टने प्रकाशित केलेल्या मुलांसाठीच्या अनेक अभिजात ग्रंथांच्या निर्मितीमध्ये योगदान दिलेल्या गोव्यातील नामांकित कलाकारांच्या प्रातिनिधिक कलाकृती सादर केल्या जातील. या प्रदर्शनात स्टोरीज ऑफ लाईट अँड डिलाईट आणि गोवा या पुस्तकांमधील मारिओ डी मिरांडा आणि शशी शेट्ये यांच्या कलाकृती सादर केल्या जातील, असे मलिक यांनी सांगितले.

**या महोत्सवाचे उद्घाटन ४ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते, कला आणि संस्कृती मंत्री रमेश तवडकर, नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष प्रा. मिलिंद सुधाकर मराठे, शिक्षण सचिव प्रसाद लोलयेकर, लोकमान्य कल्चरल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. किरण ठाकूर, विश्वस्त आणि पुणे पुस्तक मेळ्याचे मुख्य संयोजक तसेच नॅशनल बुक ट्रस्ट इंडियाचे संचालक युवराज मलिक यांच्या उपस्थितीत होणार आहे.**

शेट्ये यांच्या गोव्याचे निसर्गरम्य देखावे, परंपरा आणि स्थानिक आकर्षण टिपणाऱ्या, आठवणींनी समृद्ध कलाकृती आणि मारिओ डी मिरांडा यांच्या गोव्याच्या जीवनाचा आत्मा दर्शवणाऱ्या विनोदी, शैलीदार आणि सामाजिक पैलू असलेल्या चित्रांद्वारे, हे प्रदर्शन अभ्यागतांना गोव्याची संस्कृती, कल्पनाशक्ती आणि कथाकथनाच्या वारशाचा एक दृश्यात्मक प्रवास घडवेल. या कलाकृती गोव्याचे एक कलात्मक समृद्ध चित्र सादर करतील, असे एनबीटीच्या संचालकांनी सांगितले. ''या मेळ्यात वंदे मातरमच्या १५० वर्षांच्या पूर्तीनिमित्त आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त एक विशेष प्रदर्शन देखील आयोजित केले जाईल,'' असेही ते पुढे म्हणाले. लोकमान्य कल्चरल फाउंडेशनचे संस्थापक किरण ठाकूर यांनी सांगितले की, २०० हून अधिक स्टॉल्स आणि हजारो पुस्तके असलेल्या या पुस्तक मेळ्याला गोव्यातील दोन लाख नागरिक भेट देतील अशी अपेक्षा आहे. यामध्ये प्रदर्शने, विक्री, पुस्तक प्रकाशन, आकर्षक संवादात्मक सत्रे आणि मुलांसाठीचे उपक्रम यांचाही समावेश असेल. कोणत्याही कार्यक्रमासाठी प्रवेश शुल्क नाही आणि सर्व पुस्तकांवर १०% सूट दिली जाईल. हा महोत्सव सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत खुला राहील, परंतु अभ्यागतांना अधिक वेळ घालवायचा असल्यास वेळ वाढवता येईल.

हा पुस्तक महोत्सव वाचकांना सहभागी होण्यासाठी आणि शोध घेण्यासाठी आमंत्रित करणारे आकर्षक अनुभव देईल. तरुण वाचकांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल, ज्यामध्ये मुलांसाठी खेळातून शिक्षण यासारख्या उपक्रमांचा समावेश आहे. बाहुल्यांच्या साहाय्याने कथाकथन आणि संगीतमय कथाकथन सत्रे, मातीकाम कार्यशाळा, व्यंगचित्र निर्मिती, पोस्टर आणि बुकमार्क बनवणे, घोषणा लेखन, कथा नाट्य, चित्रकला, प्रश्नमंजुषा, लोकनृत्य सादरीकरण आणि कोड्यांची फेरी यांसारखी संवादात्मक सत्रे कल्पनाशक्तीला चालना देण्यासाठी आणि वाचनाची आजीवन आवड निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आली आहेत.



**भारतीय हवाई दलाचे चाचणी वैमानिक आणि अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला, ए.सी. हे दुसऱ्या दिवशी युवराज मलिक यांच्यासोबत एका आकर्षक सत्रात आपले अनुभव सांगतील. हे विशेष सत्र दिल्ली, पुणे आणि नागपूर येथील एनबीटीच्या पुस्तक महोत्सवांमध्ये एक विशेष आकर्षण ठरले आहे.**

लेखक कट्टा या विशेष विभागात साहित्यिक सत्रांची एक प्रभावी मालिका आयोजित केली जाईल, जिथे कल्पना आणि दृष्टिकोनांचा महासागर सामायिक केला जाईल. देशभरातील प्रसिद्ध लेखक, पत्रकार, विचारवंत आणि सर्जनशील व्यक्ती चर्चा, संवाद आणि विचारमंथनातून प्रेक्षकांशी संवाद साधतील. यामध्ये उदय माहूरकर, मृणाल कुलकर्णी, अविका गौर, शांतनू गुप्ता, चंद्रप्रकाश द्विवेदी, मोहन शेटे, मेधा खासगीवाले, एम. जे. अकबर, सुमंत बात्रा, अमोल पराशर, सचिन पिळगावकर, सदानंद श्रीधर मोरे, आचार्य प्रशांत इत्यादींचा समावेश आहे.

# काँग्रेसला सत्ताधीश बनविण्याचे गुजर यांच्यासमोर आव्हान

भारतीय जनता पक्षाकडून प्रत्येक पक्षाला सुरुंग लावण्याचे होत असलेले काम, मरगळलेली काँग्रेस, पक्षाविषयी नसलेली निष्ठा, सत्तेसाठी काँग्रेस निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलण्याचा फंडा, विचारातील विसंगती, काँग्रेस श्रेष्ठींचे दुर्लक्ष अशा विपरीत परिस्थितीत काँग्रेसचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांच्यासमोर काँग्रेस एकसंघ आणि काँग्रेसला सत्ताधीश करण्याचे मोठे आव्हान आहे. काँग्रेसमध्ये आपले करिअर घडविणारे अनेक नेते आज काँग्रेसला सोडून दुसऱ्या पक्षात राज्य करीत आहेत. केवळ सत्तेसाठी त्यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपाशी घरोबा केला. मीच मोठा या न्यायाने काँग्रेसमध्ये गल्लोगल्ली भांडणे सुरू झाली. पक्ष श्रेष्ठींनीही त्याकडे दुर्लक्ष केल्याने काँग्रेस आज केवळ नावाला ऊरली. म्हातारी मेल्याचे दुःख नाही; मात्र काळ सोकावला याप्रमाणे काँग्रेस पक्षातील अनेक दिग्गजांना भारतीय जनता पक्षाने खुणावले आणि तसतशी काँग्रेस हळूहळू गटांगळ्या खात आहे. या पुढचा काळ सार्वत्रिक असलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती, ग्रामपंचायती, सोसायट्या, जिल्हा बँक, साखर कारखाने असा निवडणुकीचा काळ आहे. काँग्रेस पक्षाच्या श्रेष्ठींना झाले गेले विसरून मोठ्या मनाने सर्वांना सामावून घेत एकत्रित बसून या निवडणुका लढवाव्या लागणार आहेत. गुजर यांना त्यासाठी मोठे कष्ट उचलावे लागणार. काँग्रेसला सावरण्यासाठी सचिन गुजर यांना प्रथमतः जुन्या सर्वच काँग्रेस नेत्यांना एकत्रित करून नव्या कार्यकर्त्यांची मोट बांधावी लागणार आहे. जिल्ह्यातील १४ तालुक्यात अध्यक्षांच्या निवडी कराव्या लागतील. महिला अध्यक्षांच्याही निवडी करून काँग्रेसला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गुजर यांना पुढाकार घ्यावा लागणार आहे.

**अहमदनगर जिल्हा पूर्वाश्रमीचा काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जात होता. याच जिल्ह्यात काँग्रेसचे दोन मातब्बर नेते मंत्री म्हणून सदोदित काँग्रेसच्या मंत्रिमंडळात होते. अलीकडच्या काळात काँग्रेस सध्या श्रीरामपूर सोडून नगर जिल्ह्यात अस्तित्वहीन झाली आहे. काँग्रेस वाढावी, रुजावी तिचा मोठ्या प्रमाणात विस्तार व्हावा आणि जिल्ह्याचे काँग्रेसने नेतृत्व करावे, अशी मात्र कोणाचीच इच्छा सध्या राहिली नाही.**



काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांना मात्र यासाठी पूर्ण वेळ द्यावा लागणार. ३५ वर्षाहून अधिक काळ गुजर काँग्रेसमध्ये आहेत केंद्र तसेच राज्यातील जवळजवळ सर्वच पक्षातील नेत्यांशी त्यांचा संवाद झालेला आहे जिल्हा आणि श्रीरामपूर तालुका त्यांना तळहाताच्या रेषेप्रमाणे माहित आहे. तेथील प्रश्न आणि राजकारण हे त्यांच्या तोंडपाठ आहे. आजपर्यंत त्यांनी पोटतिडकीने जेथे असतील तेथे काम केले. आगामी सर्व त्या निवडणुकांसाठी विरोधकांची पूर्ण तयारी झाली असली तरी काँग्रेसला आरपारची लढाई म्हणून त्यात उतरावे लागणार आहे. सध्या जिल्हा कार्यकारिणी बनवण्यासंदर्भात गुजर यांना तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे. सर्वसमावेशक अशी कार्यकारिणी घोषित करून निवडणुकीची तयारी आणि सत्ता मिळवण्यासाठी संपूर्ण जिल्हाभर तालुका तालुक्यात आणि गावागावात गुजर यांच्यासह काँग्रेस कार्यकर्त्यांना सक्रिय व्हावे लागेल. काँग्रेसला सध्या फार काही नवीन करण्याची गरज नसून केवळ श्रेष्ठींना बरोबर घेऊन जुन्या नव्या कार्यकर्त्यांचा मेळ घातल्यासच काँग्रेसला उभारी मिळू शकते. गुजर ते करतील आणि त्यासाठी बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे अशा अनेक जुन्या नव्या कार्यकर्त्यांचे बळ त्यांच्या पाठीशी हवे आहे. संगमनेर आणि श्रीरामपूर या दोन तालुक्यांनी काँग्रेसला वेगळे होऊ दिले नाही.

**गेल्या काही वर्षापासून जिल्ह्यातील काँग्रेसला मरगळ आली आहे. मंत्री पदाच्या काळात बाळासाहेब थोरात यांनी नगर जिल्ह्यात पक्षाकडे फारसे लक्ष दिले नाही. त्याचा परिणाम काँग्रेसला आज फार मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी वेगळ्या संकटाला तोंड द्यावे लागत आहे.**



शफीक बागवान
९८६०४००६८५
श्रीरामपूर
राज की बात

अलीकडच्या काळात संगमनेर विधानसभा आणि नगरपालिका त्यासाठी अपवाद ठरली. तत्कालीन आमदार स्व. जयंतराव ससाणे यांनी जिल्हा आणि राज्य पातळीवर श्रीरामपूर नगरपालिकेच्या माध्यमातून केलेल्या विकास कामांमधून थेट विधानसभेपर्यंत मजल मारली आणि श्रीरामपूरवर कायम काँग्रेसचा झेंडा ठेवला. संगमनेरची परिस्थिती यापेक्षा वेगळी नव्हती मात्र संगमनेर पालिकेवर पक्ष विरहित झेंडा फडकवण्यात आला. वेळ काळ आणि संधी असतानाही काँग्रेस मात्र नगर जिल्ह्यात वाढली नाही. केवळ काही कुटुंबांकडेच या काँग्रेसची सूत्रे एकवटल्याने काँग्रेसला अनेक ठिकाणी अपयशाला सामोरे जावे लागत आहे. गुजर यांना याकडे लक्ष द्यावे लागेल तर आणि तरच काँग्रेस उभारी घेईल.

# भाविकांची अडवणूक करणाऱ्या एजंटांवर प्रतिबंधात्मक कारवाईचे आदेश

**शिर्डी । रयत समाचार**

साईबाबा समाधी मंदिर परिसरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची पिळवणूक थांबवण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. भाविकांची वाहने अडवून त्यांना विशिष्ट दुकानांतूनच पूजासाहित्य खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या तसेच खासगी पार्किंगचा आग्रह धरणाऱ्या एजंटांवर भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १५२ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार आहे. याबाबतचे सशर्त आदेश शिर्डी विभागाचे उपविभागीय दंडाधिकारी माणिक आहेर यांनी निर्गमित केले आहेत. शिर्डीत दररोज देश-विदेशातून लाखो साईभक्त दर्शनासाठी येतात. मात्र मंदिर परिसर व शहरातील सार्वजनिक रस्त्यांवर काही खासगी व्यक्ती भाविकांची वाहने बेकायदेशीरपणे अडवत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. आदेशानुसार शिर्डी गावाच्या बाहेरील तसेच गावातील सार्वजनिक रस्ते, चौक, बसथांबे व प्रवेश मार्गांवर भाविकांची वाहने थांबवून त्यांची दिशाभूल करण्यास मनाई करण्यात आली आहे. कोणत्याही वाहनधारकास विशिष्ट दुकान, आस्थापना किंवा निवासस्थानीच जाण्यास भाग पाडता येणार नाही. तसेच कोणत्याही व्यक्तीने स्वतःला देवस्थान ट्रस्ट किंवा प्रशासनाचा अधिकृत प्रतिनिधी असल्याचे भासवू नये, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. भोजन, निवास किंवा दर्शनाच्या नावाखाली मध्यस्थी करणाऱ्यांवरही निर्बंध घालण्यात आले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम २२३ अन्वये कारवाई करण्यात येईल. या आदेशाने बाधित झालेल्या व्यक्तींना ता. १६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आली आहे.

भाविकांना खासगी पार्किंगमध्ये वाहने नेण्यास भाग पाडले जाते, तसेच विशिष्ट दुकानांतून अव्वाच्या सव्वा दरात पूजासाहित्य खरेदी करण्यास सक्ती केली जाते. अनेकदा दमदाटी, शिवीगाळ व धक्काबुक्कीचे प्रकारही घडल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी हे आदेश जारी करण्यात आले आहेत.

# महसूल सहायक ओम खुपसे यांचा गौरव



**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**

महसूल विभागात आपल्या कार्यतत्परतेने वेगळी ओळख निर्माण करणारे महसूल सहायक ओम खुपसे यांना 'उत्कृष्ट निवडणूक महसूल सहायक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १६ व्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त प्रांताधिकारी किरण सावंत पाटील आणि तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या हस्ते हा गौरव सोहळा पार पडला. यावेळी राज्य कर उपायुक्त अनिल काळे व पोस्टमास्तर महेश कोबरणे यांची प्रमुख उपस्थिती होती. ओम खुपसे यांच्या कामाप्रती असलेल्या निष्ठेची प्रचिती काही महिन्यांपूर्वीच आली होती. त्यांची बदली शनी शिंगणापूर येथे झाली असता, श्रीरामपूरमधील बीएलओ बांधवांनी आक्रमक भूमिका घेत ही बदली रद्द करण्याची मागणी केली होती. सन २०२३ ते २०२५ या कालावधीत निवडणूक शाखेत कार्यरत असताना खुपसे यांनी विधानपरिषद, लोकसभा, विधानसभा, नगरपरिषद निवडणूक, मतदार नोंदणी तसेच मतदार यादी अद्ययावतीकरणाची कामे अत्यंत पारदर्शकपणे पार पाडली. त्यांच्या या 'धुरंधर' कार्यशैलीची दखल घेत प्रशासनाने त्यांचा गौरव केला. महसूल विभागातील कर्मचारी, अधिकारी व बीएलओ वर्गातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**बीएलओंच्या हक्काचा माणूस ओम खुपसे म्हणजे केवळ एक अधिकारी नसून निवडणूक शाखेचा कणा आहेत. कामाचा कितीही ताण असला, तरी प्रत्येक बीएलओला सन्मानाने वागणूक देणे व त्यांच्या अडचणी तत्काळ सोडवणे ही त्यांची कामाची पद्धत आहे. त्यांना मिळालेला हा पुरस्कार आमच्या संघर्षाचा आणि त्यांच्या प्रामाणिक कामाचा विजय आहे.**

**जितू रहाटे**, बीएलओ, जाफराबाद